MHAU070062932025

<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ८०८/२०२५</u>
<u>प्रकाश रामभाऊ चित्ते वि. रविकुमार रामेश्वर गर्ग व इतर</u>
<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी वादमिळकतीच्या सामाईक ताब्यातुन वादीस बेदखल करु नये, कब्जे वहिवाटीस अडी अडथळा करु नये, मालकी हक्कात कोणताही फेरबदल करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, अर्जाच्या परिच्छेद क्र. १ मधील नमुद केलेली मिळकत ही वाद मिळकत आहे. वादी व प्रतिवादी क्र. ५ व ६ हे सख्खे भाऊ असुन, प्रतिवादी क्र. ४ ही त्यांची आई आहे. रामभाऊ तात्याबा चित्ते हे वादी व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे वडील असुन प्रतिवादी क्र. ४ चे पती होते ते दि. ३०.०४.२०१५ रोजी मयत झाल्यानंतर फेरफार क्र. २०७० नुसार सर्व वारसांची नोंद वादमिळकतीला नोंदवण्यात आली. त्यानंतर वादी व प्रतिवादी क्र. ५ व ६ यांच्या बहिणी नामे रंजना साळवे व शशीकला साठे वाद मिळकतीतील त्यांचा हकक सोडुन दिला. त्याप्रमाणे फेरफार क्र. २१७६ दि. २१.०४.२०१८ रोजी मंजुर झाला. सन २०१८ पासुन वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ६ हे वाद मिळकतीचा एकत्रीत रित्या उपभोग घेत होते. अदयाप पावेतो वाद मिळकतीचे वाटप झालेले नाही.

३. असे असताना प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी आपसात संगणमत करुन खोटे वाटणीपत्र तयार केल्याचा उल्लेख करुन, तथाकथीत वाटणीपत्रावर वादीची सही नसताना, प्रतिवादी क्र. ७ यांच्याकडे अर्ज करुन फेरफार क्र. २२८३ मंजुर करुन घेतला. वादीचा प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्यावर पूर्ण विश्वास असल्याने त्याने कधीही महसुल कागदपत्रे बघीतली नाहीत. त्यामुळे फेरफार क्र. २२८३ बाबत माहिती नव्हती.

मध्यंतरीच्या काळात वाद मिळकत प्रतिवादी क. ४ व ६ विक्रीस काढल्याची माहिती मिळाली. दि.१७.०७.२०२५ रोजी वादीने वाद मिळकतीचा ७/१२ उतारा काढुन पाहिला असता वादी व प्रतिवादी क. ४ ते ६ यांच्या नावाचा स्वतंत्ररित्या अंमल झाल्याचे दिसुन आले. तदनंतर दि. ०१.०८.२०२५ रोजी वादीने फेरफार क्र. २२८३ काढुन पाहिला.

६. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी तथाकथीत वाटणीपत्राआधारे वाद मिळकतीच्या ७/१२ उता-यात त्यांच्या नावाचा अंमल करुन घेतल्यानंतर त्यांचे नावे असलेले एकत्रीत क्षेत्र १ हे ३० आर ही जमीन प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना नोंदणीकृत खरेदीखता अन्वये दि. १७.०५.२०२५ रोजी विक्री केली. या दस्ताआधारे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रतिवादी क्र. ७ यांच्या कार्यालयात फेर मंजुरीसाठी अर्ज दिला असुन वादीने त्यामध्ये आक्षेप घेतला आहे. वादीने त्याच्या कब्जास तारेचे कुंपन देखील केले आहे. असे असताना देखील दि. ०७.०९.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ हे तेथे आले व वादीस वाद मिळकतीत पाय ठेवायचा नाही अशी धमकी दिली. सदर, वाटणीपत्र, खरेदीखत हे वादीच्या अपरोक्ष झाले आहे. सबब वादीवर ते बंधनकारक नाही.

६. वादीतर्फे विधीज्ञ श्री के.आर. कऱ्हाळे यांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. पटलावर दाखल असलेल्या प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्या चतु:सिमेत वादीचे नाव नोंदवण्यात आलेले नाही. चार सह मालकांपैकी तीन मालकांनी त्यांची मिळकत विक्री केली असल्यास त्याच्या चतु:सिमेत उरलेल्या एकाचे नाव येणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात मुळात वाद मिळकतीचे वाटप झालेले नाही. जे वाटप झाले ते वादीच्या संमती शिवाय झालेले आहे. अशा परिस्थीतीत उपरोक्त

खरेखीखताच्या चतु:सिमेत वादीचे नाव येणे आवश्यक होते. प्रथमदर्शनी तरी खरेदीखताच्या चतु:सिमेत वादीचे नाव नोंदवण्यात न आल्याने वादीच्या कथनात तथ्थ दिसुन येते. अशा परिस्थितीत अर्ज मंजुर करणे उचित होईल. सबब अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकूम मंजुर करणे आवश्यक आहे असे दिसुन येते. करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करणे उचीत होईल असे मला वाटते.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. असा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकूम पारित करण्यात येतो की, प्रतिवादी वा त्यांच्यातर्फे कोणीही दि. २९.०९.२०२५ पर्यत वाद मिळकतीतील वादीच्या कब्जे वहिवाटीस, हरकत, अडथळा करु नये. तसेच बेदखल करु नये, मालकी हक्कात कोणताही फेरबदल करु नये.

३. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ अ प्रमाणे पालन करुन त्याची पावती या न्यायालयात आदेश दिनांकाच्या दुस-या दिवशी दाखल करावी.

४. प्रतिवादींना अशी कारणे दाखवा नोटीस काढण्यात येते की, सदर अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकूम पुढे का सुरु ठेवु नये यासाठी लेखी जबाब दाखल करावा.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.09.18 10:49:30 +0000

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2025.09.16 17:57:28 +0000

**(आर. एन. पाठक)**

दिनांक:- १६/०९/२०२५

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba AgeStenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 16/09/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 16/09/2025 |
| Judgment uploaded on | : 16/09/2025 |